**सरकारतर्फे सा.क्र. 1**

**शपथेवर**

माझे नांव : आदिनाथ तुकाराम पठारे,
वय : ३७ वर्षे, धंदा : शेती,
राहणार : पठारे वस्ती ,लोहगाव, ता.नेवासा, जि.अहमदनगर

**सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू** -

१. आरोपी क्र. १ ते ४ यांना मी ओळखतो कारण ते माझे भाउबंध आहेत. घटना साधारण: दोन ते अडीच वर्षापुर्वी माझ्या राहत्या घरी सकाळी सात ते साडे सातच्या दरम्यान घडली होती. माझ्यामध्ये आणि आरोपींमध्ये किरकोळ वाद झाले होते म्हणुन मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. आता मला तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे परंतु मला मजकुराबाबत माहिती नाही. सही **निशाणी २१** देण्यात येते. आरोपी क्र.३ ने लोखंडी गजाने मला मारले होते व आरोपी क्र. १, ३ व ४ यांनी मला, माझी पत्नी, आई, वडील, चुलती यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती असे काही घडले नव्हते. **(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे त्यास भारतीय पुरावा कायदा १८७२ कलम १५४ प्रमाणे पुरावा घेण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटना दि. ०२/०५/२०२२ रोजी माझ्या राहत्या घरी सकाळी सातच्या सुमारास घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ते ४ हे माझ्या घरात आले व शेतातील कॉंगेस मी आरोपीच्या शेतात टाकल्याच्या कारणावरून त्यांनी मला शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे वडील मला सोडवण्यासाठी आले असता आरोपींनी माझ्या वडीलांना ढकलुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ ने त्याच्या हातातील लोखंडी गजाने माझ्या उजव्या डोळयाच्या वर भुवई जवळ मारहाण करून जखमी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपींनी माझी आई, पत्नी व वडील यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मला सोडवण्यासाठी माझी चुलती सावित्रीबाई पठारे आली असता आरोपी क्र. २ धीरज याने तिला हाताच्या चापटीने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आमचा आरडाओरडा झाल्यानंतर इतर लोक जमा झाल्यानंतर आरोपी तेथुन निघुन गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी सोनई पोलीस ठाण्यात गेलो असता पोलिसांनी मला मेडिकल यादी दिली व त्याप्रमाणे मी अहमदनगर येथील सिव्हील हॉस्पीटल मध्ये ॲडमीट

झालो होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी चुलती, पत्नी व आई या पुढील उपचाराकरीता नेवासा ग्रामीण रूग्णालयामध्ये गेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी हॉस्पीटलमध्ये उपचार घेत असताना दि. ०४/०५/२०२२ रोजी पोलीस हॉस्पीटलमध्ये आले होते व त्यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे जबाब लिहुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तो जबाब मला वाचुन दाखविला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. पोलीसांनी घटनेबाबत माझा जबाब तसा का नोंदविला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपींमध्ये आपापसात तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**
**<u>आरोपींतर्फे विद्वान वकिल श्री. एन. एस. जोशी यांनी उलटतपास नाकारला</u>.**

स्वाक्षरीत/-

(लीना अ. काळे)
दिनांक :०४/११/२०२५
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४, नेवासा